# मुंबई विद्यापीठ

**निवडणूक विभाग**

## परिपत्रक

क्र.नि.वि./आयसीडी /२०२२-२३/४४. दिनांक : २३ मे, २०२३.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२)(द)(r) नुसार अधिसभेवर दहा (१०) अध्यापक आणि कलम ३२(३)(छ)(g) नूसार विद्यापरिषदेवर प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधीत्व करणारे प्रत्येकी दोन (२) अध्यापक मतदार संघाची निवडणूक जुन, २०२३ मध्ये होणार आहे.

कलम ३२(३)(छ)(g) पुढीलप्रमाणे :-

*"अध्यापक गटाने आपल्यामधून निवडून द्यावयाचे पंधरा वर्षापेक्षा कमी नसेल इतका अध्यापनाचा अनुभव असलेले, प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधीत्व करणारे दोन अध्यापक, त्यांपैकी एक अनुसूचित जातीची किंवा अनुसूचित जमातीची किंवा निरधिसूचित जमातीची (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमातीची किंवा इतर मागासवर्गाची व्यक्ती असेल, परंतु प्रत्येक विद्याशाखेचे आरक्षण हे चिठ्ठया टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरवण्यात येईल.*

*परंतु, या खंडान्वये, प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या अध्यापकांपैकी, एक अध्यापक ही, चिठ्ठया टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरविण्यात येईल अशी महिला असेल''*

या परिपत्रकाद्वारे असे कळविण्यात येते की, उपरोक्त कलमानुसार प्रत्येक विद्याशाखेच्या आरक्षणाची सोडत काढण्याकरिता समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीची बैठक बुधवार दिनांक २४ मे, २०२३ रोजी दुपारी १२ वा. व्यवस्थापन परिषदेचे दालन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, विद्यानगरी, कालिना, सांताक्रूझ (पुर्व), मुंबई - ४०० ०९८ येथे आयोजीत केली आहे.

स्वाक्षरीत/-

(सुनिल भिरूड)
कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी